# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)
जि. ठाणे — 401 107. दूरध्वनी : 022-28121455, * E-mail Id : tp@mbmc.gov.in


सिस्टीम मॅनेजर, नागरी सुविधा केंद्र

जा.क्र :- मनपा/नर/ 2345 2023- 2024 दिनांक :- 26/10/2023

प्रति,
सिस्टीम मॅनेजर
नागरी सुविधा केंद्र
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका सुधारीत विकास योजना
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 28(4) अन्वये मिरा भाईंदर शहराच्या प्रारुप सुधारित विकास योजना प्रसिद्धीबाबत. आरेखकीय व तत्सम शुध्दीपत्रक (Corrigendum) काढणेबाबत.

संदर्भ :- 1) मा. नियुक्त अधिकारी यांचेकडील जा.क्र.सुप्रावियो-मिभा मनपा/प्रसिद्धी/ससंठाणे/2593 दि.28/10/2022 रोजीचे पत्र.
2) मा.नियुक्त अधिकारी यांचेकडील जा.क्र.प्रासुवियो-मिभा/ससंठाणे/7126 दि.25/10/2023

महोदय,

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची प्रारुप सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 26(1) अन्वये दि.28/10/2022 रोजी नियुक्त अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, ठाणे यांचे कार्यालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आली होती. आता सदर प्रारुप सुधारीत विकास योजनेवरील प्राप्त हरकती / सुचनांच्या अनुषंगाने फेरबदल महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 28(4) अन्वये दि.25/10/2023 रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. उक्त कलम 28(4) अन्वये प्रसिध्द केलेले प्रारुप सुधारीत विकास योजना नकाशे नागरीकांच्या अवलोकनार्थ संकेतस्थळावर दि.25/10/2023 प्रसिध्द करण्यात आलेले आहेत. परंतु संदर्भिय पत्र क्र.2 अन्वये प्राप्त पत्रानुसार त्यामध्ये खालील प्रमाणे चुका निदर्शनास आलेले आहेत असे कळविलेले आहे.

1) प्रसिध्द नकाशांवरती दर्शविण्यात आलेल्या Key Map वर नवघर ऐवजी गोडदेव हे गाव दर्शविण्यात आलेले आहे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नगररचना विभाग
स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पु.)
जि. ठाणे – 401 107. दूरध्वनी : 022-28121455, * E-mail Id : tp@mbmc.gov.in
सिस्टीम मॅनेजर, नागरी सुविधा केंद्र

**जा.क्र :- मनपा/नर/** 2349 2023 - 2024 **दिनांक :-** 26/10/2023

2) ग्रीड क्र.8,13,14,15,22,23,29,30 या नकाशांवर नवघर ऐवजी गोडदेव हे गाव दर्शविण्यात आलेले आहे.

3) कलम 28 (4) च्या सुचनेसोबत जोडण्यात आलेले मराठी व इंग्रजी परिशिष्ठ 'अ' मधील एम-206 मध्ये मौजे वरसावे ऐवजी मौजे घोडबंदर लिहिण्यात आलेले आहे.

वरील आरेखकीय चुकांच्या अनुषंगाने नकाशांमध्ये तसेच परिशिष्ठ 'अ' मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार वर नमुद शुध्दी पत्र काढुन प्रकरणी सदर सुधारित नकाशे व परिशिष्ठ 'अ' नकाशे संकेतस्थळावर नागरीकांच्या अवलोनार्थ प्रसिध्द करण्यात यावे हि विनंती.

सोबत :- पेनड्राइव्ह मध्ये Soft Copy

**(मा. आयुक्त तथा प्रशासक सो., यांचे मान्यतेने.)**

**(सुजित पानसरे)**
**नगररचनाकार**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत :- माहितीस्तव**
मा. नियुक्त अधिकारी
मिरा-भाईंदर विकास योजना
तथा सहाय्यक संचालक, नगररचना,
ठाणे शाखा, ठाणे

महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
ठाणे शाखा

**जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, ३ रा मजला, कोर्ट नाका, ठाणे (प) - ४०० ६०१**

ईमेल- adtp1.thane@maharashtra.gov.in/adtpthane@gmail.com दूरध्वनी क्रमांक ००२२-२५३४२७४४

जा.क्र.प्रासुवियो मिभा /ससंठाणे/७१२९, दिनांक :२५/१०/२०२३

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर
आ. क्र.
दाखल ता. नर/सप-४८२
२५/१०/२०२३
सहाय्यक संचालक नगररचना
मि.भा.म.न.पा.

प्रति,

मा. आयुक्त,
मिरा-भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर

विषय :- **प्रारुप सुधारित विकास योजना –मिरा –भाईंदर**
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचनाअधिनियम, १९६६ चे कलम २८(४) अन्वये प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- १. या कार्यालयची सुचना क्र. मिभावि/प्रासुवियो-मिरा-भाईंदर /कलम-२८ (४)/ प्रसिध्दी/ ७०८४, दि. २३/१०/२०२३.
२. या कार्यालयाचे पत्र क्र. सुप्राविया -मिभामनपा/ प्रसिध्दी /ससंठाणे/७०८८, दि. २३/१०/२०२३.

महोदय,

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीची प्रारुप सुधारित विकास योजना तयार करण्यात आलेली असुन प्राप्त सुचना / हरकतींच्या अनुषंगाने फेरबदल महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचनाअधिनियम, १९६६ चे कलम २८(४) अन्वये दिनांक २५/१०/२०२३ रोजी वृत्तपत्रात व राजपत्रात प्रसिध्द करण्यता आलेले आहे.

संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये उक्त कलम २८ (४) अन्वये प्रसिध्द प्रारुप विकास योजना नकाशे आपल्या कार्यालयात व संकेत स्थळावर नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रदर्शित करण्यासाठी नकाशे, अहवाल, मराठी व इंग्रजी सुचना

व त्या सोबतचे परिशिष्ठ ‘अ’ आपल्या कार्यालयाकडे सादर करण्यात आलेले आहे. सदर सादर केलेल्या नकाशांमध्ये खालील प्रमाणे आरेखकीय चुका निदर्शनास आलेल्या आहेत.

१. प्रसिध्द नकाशांवरती दर्शविण्यात आलेल्या Key Map वर नवघर ऐवजी गोडदेव हे गाव दर्शविण्यात आलेले आहे.

२. ग्रीड क्र. ८, १३, १४, १५, २२, २३, २९, ३० या नकाशांवर नवघर ऐवजी गोडदेव हे गाव दर्शविण्यात आलेले आहे.

३. कलम २८ (४) च्या सुचनेसोबत जोडण्यात आलेले मराठी व इंग्रजी परिशिष्ठ ‘अ’ मधील एम – २०६ मध्ये मौजे वरसावे ऐवजी मौजे घोडबंदर लिहिण्यात आलेले आहे.

वरील आरेखकीय चुकांच्या अनुषंगाने नकाशांमध्ये तसेच परिशिष्ठ ‘अ’ मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. सदर सुधारित नकाशे व परिशिष्ठ ‘अ’ नकाशे आपल्या कार्यालयात व संकेत स्थळावर नागरिकांच्या अवलोकनार्थ प्रदर्शित पुढील कार्यवाहीस्तव आपल्या कार्यालयाकडे सादर करण्यात येत आहे.

आपला,

(किशोर भि. पाटील)
नियुक्त अधिकारी,
मिरा-भाईंदर विकास योजना
तथा
सहायक संचालक, नगर रचना,
ठाणे शाखा, ठाणे

प्रत :- सहायक संचालक, नगररचना, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव